# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा**

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## दि. २९/०९/२०२१

## -: कार्यक्रम पत्रिका :-

| | | |
|---|---|---|
| १. दुपारी १२.५५ वाजता | :- | बँकेचे चेअरमन, व्हा. चेअरमन व सर्व संचालक यांचे आगमन. |
| २. दुपारी १.०० वाजता | :- | दीप प्रज्वलन व भारतमाता प्रतिमेचे मान्यवरांचे हस्ते पूजन. |
| ३. दुपारी १.०५ वाजता | :- | अहवाल सालातील दिवंगत झालेल्या राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रातील व्यक्ती, बँकेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक तसेच कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दिवंगत झालेल्या सर्व ज्ञात/अज्ञात व्यक्तींना विनम्र श्रध्दांजली. |
| ४. दुपारी १.१० वाजता | :- | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अजेंडानुसार विषयांचे वाचन. |
| ५. दुपारी १.२५ वाजता | :- | बँकेचे अध्यक्ष मा. श्री. शिरीष देशपांडे यांचे अध्यक्षीय मनोगत. |
| ६. दुपारी २.०० वाजता | :- | सभा समारोप व आभार - मा. श्री. विजय चव्हाण (व्हा. चेअरमन) |

*************************************************************************

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा**

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## सभेपुढील विषय

**विषय क्र. १ :- मागील सभा दि. २८/०३/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**कोविड-१९ च्या साथीच्या प्रादुर्भावामुळे असलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर बँकेची मागील वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८/०३/२०२१ रोजी बँकेच्या मुख्य कार्यालयात व्हिडीओ कॉन्फरसिंग (VC) द्वारे ऑनलाईन पध्दतीने पार पडली. सदर सभेस एकूण ६८१ सभासद उपस्थित होते. सदर सभेमध्ये एकूण १६ विविध विषयांवर चर्चा होवून त्या संबंधीचे ठराव मंजूर करण्यात आले. सदर दि, २८/३/२०२१ रोजी संपन्न झालेल्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी ही विनंती.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

विषय क्र. २ :- सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचा अहवाल व वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करून त्यास मान्यता देणे.

आपल्या बँकेचे सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्ष मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएट्स सातारा (चार्टर्ड अकाउंटंट सातारा) यांनी केले असून दि.३१/०३/२०२१ रोजीचा बँकेचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक प्रमाणित केलेले आहे. दि. ३०/०८/२०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळ सभेमध्ये सदर ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यास ठराव क्र. २ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तरी संचालक मंडळाने मंजूरी दिलेल्या सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करून त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

विषय क्र. ३ :- मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२०-२१ च्या नफ्याच्या विनियोगास दिलेल्या मंजूरीस मान्यता देणे.

दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या अर्थिक वर्षात बँकेस रू. ७४,७९५/- इतका तोटा झालेला आहे. मागील वर्षाचा संचीत तोटा रू. ०/- असून सन २०२०-२१ चा तोटा संचीत तोट्यात वर्ग केल्यानंतर एकूण संचीत तोटा रू. ७४,७९५/- इतका राहिला आहे. मा, संचालक मंडळ सभा दि. ३०/०८/२०२१ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ४ अन्वये नफा-तोटा विनियोगास संचालक मंडळाने खालील प्रमाणे शिफारस केलेली आहे.

नफा/तोटा विभागणी :-

| अ.क्र. | तपशील | रूपये/पैसे |
|---|---|---|
| १ | मागील वर्षाचा संचीत तोटा | ०.०० |
| २ | दि. ३१ मार्च २०२१ रोजीचा तोटा संचीत तोट्यात वर्ग | ७४,७९५.०० |
| ३ | शिल्लक संचीत तोटा | ७४,७९५.०० |
| | एकूण | ७४,७९५.०० |

वरील प्रमाणे नफा-तोटा रकमेचा विनीयोग करण्यास मा. वार्षिक सर्वसाधारण सभेने कार्योत्तर मान्यता द्यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा**

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. ४ :- सन २०२१-२२ सालचे अंदाज पत्रक संमत करणे मान्यता देणे व सन २०२०-२१ सालात अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबींवर अधिक खर्च झालेला आहे अशा बाबींस मान्यता देणे.**

**सन २०२१-२२ चे अंदाज पत्रक**

**(रू. लाखांत)**

| **उत्पन्न तपशील** | | **खर्च तपशील** | |
|---|---|---|---|
| **उत्पन्न तपशील** | **अंदाजे उत्पन्न** | **खर्च तपशील** | **अंदाज** |
| कर्जावरील व्याज | ३३०.०० | ठेवीवरील व्याज | २३०.०० |
| गुंतवणूकीवरील व्याज | ११.०० | बाहेरील कर्जा वरील व्याज | २.०० |
| शासकिय रोखे गुंतवणूकी वरील व्याज | ५०.०० | सेवक,पगार,बोनस,भत्ते. प्रॉ.फंड | ८०.०० |
| इतर उत्पन्न | ११.०० | प्रशासकिय व इतरखर्च | ४०.०० |
| | | घसासा व तरतुदी | २५.०० |
| | | नफा | २५.०० |
| **एकूण** | **४०२.००** | **एकूण** | **४०२.००** |

**सन २०२१-२२ या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रकास दि. ३०/०८/२०२१ रोजी पार पडलेल्या मा. संचालक मंडळ सभेमधील ठराव क्र. ५ नुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर अंदाजपत्रकास मा. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूरी द्यावी ही विनंती.**

**सन २०२०-२१ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेला खर्च :-**

**(रू. लाखांत)**

| **उत्पन्न तपशील** | | | | **खर्च तपशील** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन्न तपशील** | **अंदाज** | **प्रत्यक्ष** | **कमी/जादा उत्पन्न** | **खर्च तपशील** | **अंदाज** | **प्रत्यक्ष** | **कमी/जादा खर्च** |
| कर्जावरील व्याज | २५०.०० | १४८.५५ | - १०१.४५ | ठेवीवरील व्याज | १६०.०० | २२३.२५ | + ६३.२५ |
| गुंतवणूकीवरील व्याज | १०.०० | १४.३९ | + ४.३९ | बाहेरील कर्जा वरील व्याज | ०.०० | ०.०० | ०.०० |
| शासकिय रोखे गुंतव णूकीवरील व्याज | २५.०० | ५१.९७ | + २६.९७ | सेवक,पगार, बोनस,भत्ते. प्रॉ.फंड | ७०.०० | ६७.५० | - २.५० |
| इतर उत्पन्न | १०.०० | १३.५१ | + ३.५१ | प्रशासकिय व इतर खर्च | ४५.०० | ६२.७५ | + १७.७५ |
| शासकिय रोखे विक्री तील नफा | १५.०० | २०.२७ | + ५.२७ | घसारा व तरतुदी | २०.०० | ५३.८७ | + ३३.८७ |
| भाग निर्लेखन | ० | १५७.९३ | + १५७.९३ | | | | |
| तोटा | ० | ०.७५ | ०.७५ | ढोबळ नफा | १५.०० | ०.०० | - १५.०० |
| **एकूण** | **३१०.००** | **४०७.३७** | **+ ९७.३७** | **एकूण** | **३१०.००** | **४०७.३७** | **+ ९७.३७** |

**सदर अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबींवर जादा खर्च खर्च झालेला आहे त्याची कारणे पुढील प्रमाणे;**

**१) ठेवींवरील व्याज अंदाजपत्रका पेक्षा रू. ६३.२५ लाखाने जास्त आहे कारण ठेवींमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाली आहे.**

**२) प्रशासकिय व इतर खर्चांमध्ये अंदाजपत्रका पेक्षा रू. १७.७५ लाखाने जास्त आहे कारण वीज बिल, विमा, इमारत भाडे व कर यामध्ये अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाली आहे.**

**३) घसारा व तरतुदी या खर्चांमध्ये अंदाजपत्रका पेक्षा रू. ३३.८७ लाखाने जास्त आहे त्याचे मुख्य कारण गुंतवणूकीवरील घसारा तरतुद करावी लागल्यामुळे सदर खर्च जास्त दिसत आहे.**

**४) सभासदांच्या भागांचे निर्लेखन करून त्यातून समायोजित होणाऱ्या रकमेतून संचीत तोटा निरस्त करण्यात आलेला आहे.**

**सन २०२०-२१ या अर्थिक वर्षातील अंदाजपत्रका पेक्षा ज्या बाबींवर जादा खर्च झालेला आहे त्या खर्चास दि. ३०/०८/२०२१ रोजी पार पडलेल्या मा. संचालक मंडळ सभेमधील ठराव क्र. ५ नुसार दिलेल्या मंजूरीस मा. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूरी द्यावी ही विनंती.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

विषय क्र. ५ :- सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल वाचून तो स्विकृत करणे.

आपल्या बँकेचे सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्ष मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएट्स सातारा (चार्टर्ड अकाउंटंट सातारा) यांनी दि. २७/०८/२०२१ रोजी पूर्ण केले असून सदर लेखापरीक्षणाचा अहवाल बँकेस दि. २९/०८/२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. वैधानिक लेखापरीक्षण अहवालात घोषीत केलेली सर्व सविस्तर माहिती बँकेच्या २५ व्या अहवालात व बँकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर लेखापरीक्षणातील महत्वाचे मुद्दे, दोष व सूचना खालील प्रमाणे आहेत,

१. मागील वर्षापेक्षा चालू वर्षात एकूण ठेवींमध्ये रू. ६९०.७३ लाखांनी (२६%) वाढ झालेली आहे.
२. मागील वर्षापेक्षा चालू वर्षात एकूण कर्जामध्ये रू. ५२.५७ लाखांनी (१.०३%) घट झालेली आहे.
३. बँकेच्या भागभांडवलाचे निर्लेखन करून त्यातून संचीत तोट्याची रक्कम समायोजित केल्याने बँकेचा संचीत तोटा निरस्त झालेला असून चालू तोटा केवळ रू. ७४,७९५/- इतका आहे.
४. बँकेचा CRAR ११.८१% इतका आहे. (CRAR चे आदर्श प्रमाण ९% च्या वर असणे अपेक्षीत आहे).
५. बँकेचा ग्रॉस NPA रू. ७६.४३ एवढा असून बँकेचे ग्रॉस NPA प्रमाण ५.६८% आहे.
६. बँकेचा नेट NPA रू. ४४.४३ लाख एवढा असून बँकेचे नेट NPA चे प्रमाण ३.८८% आहे.
७. बँकिग रेग्युलेशन अॅक्त १९४३ चे कलम १८ नुसार बँकेचा CRR व कलम २४ नुसार बँकेचा SLR याचे योग्य प्रमाणे बँकेने राखलेले असून यामध्ये कोणतेही उल्लंघन झालेले नाही .
८. बँकेने अहवाल सालात भारतीय रिझर्व्ह बँकेचे रिटर्न्स वेळेत सादर केलेले आहेत.

९. बँकेने ठेवींवरील विम्याचा (DICG) हप्ता दि. २१/०५/२०२१ रोजी भरलेला असून तो विहीत मुदतीत भरणा केलेला आहे.

१०. बँकेने वैयक्तीक महत्तम कर्ज मर्यादा व समुह महत्तम कर्ज मर्यादा यांचे योग्य रितीने पालन केलेले असून त्याबाबतच्या नियमांचे उल्लंघन झालेले नाही.

११. बँकेने अर्थिक वर्ष अखेर एकूण वितरीत केलेल्या कर्जामध्ये प्राधान्यक्रम क्षेत्राचे प्रमाण ६७% आहे तर दुर्बल घटक क्षेत्रासाठी वितरीत केलेल्या कर्जाचे प्रमाण २२% आहे. सदरचे प्रमाण हे भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्धारीत केलेल्या प्रमाणांशी सुसंगत आहे.

१२. बँकेने संचालक व त्यांचे नातेवाईक यांना अहवाल सालात कर्ज वाटप केलेले नसून येणेबाकी निरंक आहे.

१३. बँकेचा सी.डी. रेषो/ कर्ज-ठेवी गुणोत्तर प्रमाण ४०% इतका असून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हे प्रमाणे ६५ ते ७०% इतके अपेक्षीत आहे. परंतू कोविड-१९ प्रादुर्भावामुळे अपेक्षीत कर्ज वितरीत न झाल्याने सी.डी. रेषो प्रमाण कमी दिसत आहे.

१४. बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २३ नुसार बँकेच्या शेअर्सचे मुल्यांकन करणे व असे मुल्यांकन झालेल्या शेअर्सचे मुल्य महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ४९ नुसार निर्लेखनाबाबतची आवश्यक ती कर्यपध्दती अवलंबून बँकेच्या लेख्यामध्ये दाखविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे तसेच राखीव निधी व भागभांडवला मधून समायोजित होणाऱ्या रकमेबाबत पुनर्बांधणी करण्याच्या धोरणास मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास दि. २८/०३/२०२१ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने दि. ३१ मार्च २०२१ रोजी बँकेच्या भागभांडवलाचे ८०% निर्लेखन करून त्यातून समायोजित हेणाऱ्या रकमेतून बँकेचा संचीत तोटा निरस्त केलेला आहे. सन २०२०-२१ या अर्थिक वर्ष अखेर बँकेस चालू तोटा केवळ रू. ०.७५ लाख इतका झालेला आहे.

१५. मा. वैधानिक लेखापरीक्षक यांनी कॅमल रेटींगनुसार बँकेस ‘ ब ’(६७.०८ गुण) ।ऑडीट वर्ग दिलेला आहे.

बँकेचे सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण अहवालास दि.३०/०८/२०२१ रोजीच्या मा. संचालक मंडळ सभेने ठराव क्र. ६ नुसार दिलेल्या मंजूरीस कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

विषय क्र. ६ :- सन २०२१-२२ या अर्थिक वर्षासाठी सहकार खात्याच्या नामतालिकेवर असणाऱ्या सनदी लेखापाल मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएटस् सातारा (चार्टर्ड अकाउंटंट सातारा) यांची भारतीय रिझर्व्ह बँकेने वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यास दिलेल्या पूर्वपरवानगीची नोंद घेवून त्यांची नेमणूक करण्यास व मानधन ठरविण्यास मान्यता देणे.

आपल्या बँकेचे सन २०२१-२२ या अर्थिक वर्षासाठी सहकार खात्याच्या नामतालिकेवर असणाऱ्या खालील लेखापरीक्षकाचे (सनदी लेखापाल) अर्ज बँकेस प्राप्त झालेले आहेत.

१. मे. आनंदकुमार गावडे अँड कंपनी चार्टर्ड अकाउंटंट पुणे -३०.
२. मे. राजकिशोर अँड असोसिएट्स चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे.
३. मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएट्स चार्टर्ड अकाउंटंट्स सातारा

बँकेस प्राप्त झालेल्या उपरोक्त अर्जांपैकी मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएट्स व मे. राजकिशोर अँड असोसिएट्स पुणे यांचे अर्ज प्राधान्यक्रमाने बँकेचे सन २०२१ – २२ या अर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यास मा. संचालक मंडळ सभा दि.०८/०२/२०२१ मधील ठराव क्र. ५ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पूर्वमान्यतेसाठी पाठविण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला. बँकने सदर प्रस्ताव भारतीय रिझर्व्ह बँकेकडे दि. २९/०७/२०२१ रोजी पाठविला असता सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएट्स चार्टर्ड अकाउंटंट सातारा यांनी केलेले असल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेने सन २०२१-२२ या अर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षक म्हणून पुनर्नियुक्तीस मान्यता दिलेली आहे. सदर पत्राची नोंद घेवून मे. एम.आर.पी.आर.एस. अँड असोसिएट्स सातारा यांची नेमणूक करण्यास व त्यांचे मानधन ठरविण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

विषय क्र. ७ :- सन २०२१-२२ व २०२२-२३ या अर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षक व कर लेखापरीक्षक यांच्या नियुक्त्या करण्यास व त्यांचे मानधन ठरविण्यास मान्यता देणे.

सन २०२१-२२ व २०२२-२३ या अर्थिक वर्षासाठी बँकेचे अंतर्गत लेखापरीक्षक व कर लेखापरीक्षक यांच्या नियुक्तीं सदर्भात बँकेकडे खालील प्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

अंतर्गत लेखापरीक्षक पदासाठी प्राप्त अर्ज.

१. मे. उमेश झंवर अँड असोसिएट्स जालना.
२. मे. अनिल मार्डिकर अँड कंपनी , चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे -३०.
३. मे. राजकिशोर अँड असोसिएट्स चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे.
४. मे. आर.आर. पिंगळे अँड कंपनी चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे.

कर लेखापरीक्षक पदासाठी प्राप्त अर्ज.

१. मे. उमेश झंवर अँड असोसिएट्स जालना.
२. मे. अनिल मार्डिकर अँड कंपनी , चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे -३०.
३. मे. राजकिशोर अँड असोसिएट्स चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे.
४. मे. आर.आर. पिंगळे अँड कंपनी चार्टर्ड अकाउंटंट्स पुणे.

वरील प्रमाणे प्राप्त अर्जांवर विचार विनिमय करून पात्र लेखापरीक्षकांची बँकेच्या सन २०२१-२२ व २०२२-२३ या अर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखा परीक्षक व कर लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यासंदर्भातील व त्याचे मानधन ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणेबाबत मान्यता मिळावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.**

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. ८ :- सन २०२०-२१ या अर्थिक वर्षात शासनमान्य एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत (OTS) सवलत देवून बंद केलेल्या कर्ज खात्यांची माहिती घेणे व त्यास कार्योत्तर मान्यता देणे.**

**सन २०२०-२१ या अर्थिक वर्षात शासनमान्य एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत (OTS) शासकिय परीपत्रकातील तरतुदींचे अनुपालन करून जी कर्ज खाती सवलत देवून बंद करण्यात आली त्याची माहिती खालील प्रमाणे,**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | शाखा | OTS साठी आवश्यक रक्कम | प्रत्यक्ष भरण्यात आलेली रक्कम | सवलत दिलेली रक्कम | जमा रक्कम | खाते बंद दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष खंडेराव पिसाळ | वाई | ३/३६१/१० | १,६७,८४९ | २,६३४ | १,६७,८४९ | २५/११/२०२० |
| २ | सौ. संगीता प्रदीप बाबर | वाई | ३/३६३/६ | २,४६,३४५ | १५,०३० | २,४६,३४५ | २२/०३/२०२१ |
| ३ | श्री. श्रीकांत एकनाथ थोरात | कोरेगांव | २/३६३/८६ | १,९०,७६५ | ४५,३०२ | १,९०,७६५ | ३०/०३/२०२१ |
| ४ | श्री. बापू तुकाराम फाळके | कोरेगांव | २/३६३/८७ | १८,७१,८८८ | ५,२३,४८४ | १८,७१,८८८ | ३१/०३/२०२१ |
| ५ | श्री. प्रमोद आबाजी फाळके | कोरेगांव | २/३६३/५१ | १,६९,६३९ | ३९,९८० | १,६९,६३९ | ३१/०३/२०२१ |
| ६ | श्री. संतोष ज्ञानदेव फाळके | कोरेगांव | २/३६३/३६ | ९७,७८५ | १७,०९१ | ९७,७८५ | ३१/०३/२०२१ |
| ७ | श्री. सुनिल दिनकर पिसाळ | कोरेगांव | २/३६३/८८ | ३२,६६६ | २४,८६० | ३२,६६६ | ३१/०३/२०२१ |
| | एकूण | | | २७,७६,९३७ | ६,६८,३८१ | २७,७६,९३७ | |

वरील प्रमाणे कर्ज खाती सवलत देवून बंद करताना सदर योजनेबाबत भारतीय रिझर्व्ह बँक व सहकार विभाग महाराष्ट्र राज्य यांचे परीपत्रकीय सूचनांचे अनुपालन करण्यात आलेले आहे तरी सन २०२०-२१ या अर्थिक वर्षात शासनमान्य एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत (OTS) सवलत देवून बंद केलेल्या कर्ज खात्यांना दि.३०/०८/२०२१ रोजीच्या मा. संचालक मंडळ सभेने ठराव क्र. ७ नुसार दिलेल्या मंजूरीस कार्योत्तर मंजूरी मिळावी ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.**

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. ९ :- बँकेचे नोंदणीकृत मुख्य कार्यालय बँकेच्या स्वमालकीच्या कोरेगांव शाखा स्थित जागेत जागेत स्थलांतरीत करण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेकडून पूर्वपरवनगी घेण्याच्या अटीवर बँकेच्या पोटनियमांत आवश्यक ती दुरूस्ती करणेबाबत....**

बँकेचा प्रशासकीय खर्च कमी करण्यासाठी सध्या भाडे करारावर असलेले बँकेचे नोंदणीकृत मुख्य कार्यालय हे बँकेच्या स्वमालकीच्या जागेत (कोरेगांव शाखा स्थित) येथे स्थलांतरीत करण्याबाबत मा. संचालक मंडळ सभा दि. २७/०४/२०२१ च्या ठराव क्र. २५ अन्वये सदरचा प्रस्ताव पूर्वमंजूरीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे दि. १४/१२/२०२० रोजी पाठविण्यात आलेला आहे तसेच त्या बाबतचा पाठपुरावा दि.१९/०३/२०२१ व दि. ०७/०४/२०२१ रोजी करण्यात आलेला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमावली प्रमाणे बँकेचे नोंदणीकृत मुख्य कार्यालय हे बँकेच्या स्वमालकीच्या जागेत (कोरेगांव शाखा स्थित) येथे स्थलांतरीत करण्याबाबत नजीकच्या काळात परवानगी मिळण्याची दाट शक्यता आहे. त्या अनुषंगाने बँकेचे नोंदणीकृत मुख्य कार्यालय बँकेच्या स्वमालकीच्या जागेत (कोरेगांव शाखा स्थित) जागेत स्थलांतरीत करण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीच्या आधीन बँकेच्या पोटनियमात आवश्यक ती दुरूस्ती करणेबाबत संचालक मंडळास अधिकार प्रदान करण्यास मान्यता द्यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. १० :- बँकेची खेड (सातारा) शाखा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीने पुणे शहरा लगत असलेल्या ग्रामपंचायत हद्दीत स्थलांतरीत करणेबाबत विचार विनिमय करणे.**

बँकेची खेड (सातारा) शाखा दि. १८/१०/२०१० पासून सातारा शहरा लगत असलेल्या खेड ग्रामपंचायत हद्दीत कार्यरत आहे. सदर ठिकणी अपेक्षीत व्यवसायवाढ होत नसल्यामुळे व तोट्यात असणाऱ्या बँकेच्या शाखा स्थलांतरीत करण्याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना असल्याने तसेच पुणे शहराची हद्द वाढ मोठ्या प्रमाणात शहरालगत असलेल्या ग्रामपंचायतींपर्यंत झालेली असल्याने तेथे नागरी वस्ती, व्यवसाय, उद्योगधंदे, औद्योगिक व शैक्षणिक संकुले, यांमुळे मोठ्या प्रमाणात व्यवसाय वाढीस चालना मिळण्यास पोषक व अनुकुल वातावरण आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील अनेक सभासदांची शाखेची मागणी असल्याने बँकेने २०२० साली बँकेची लोणंद शाखा पुणे शहरालगतच्या नऱ्हे ग्रामपंचायत हद्दीत स्थलांतरीत केल्यानंतर शाखेची मोठ्या प्रमाणात व्यवसाय वाढ झालेली असल्याने या सर्व बाबींचा विचार करता बँकेची खेड (सातारा) शाखा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीने पुणे शहरा लगत असलेल्या ग्रामपंचायत हद्दीमध्ये स्थलांतरीत करणेबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेस प्रस्ताव सादर करण्याचे व त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास अधिकार प्रदान करण्यास मंजूरीस मा. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूरी द्यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.**

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. ११ :- बँकेच्या संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

बँकेने संचालक व त्यांचे नातेवाईक यांना सन २०२०-२१ या अर्थिक वर्षात मुदत ठेव तारण व सोने तारण कर्ज वगळता कुठल्याही प्रकारचे कर्ज वाटप केलेले नसून येणेबाकी निरंक आहे. सदर विषयाची सर्व सभासदांनी नोंद घेवून त्यास मान्यता द्यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.**

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. १२ :- बँकेच्या भागभांडवलाचे निर्लेखना संदर्भात अपर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे कार्यालयाकडील दि. १४/०६/२०२१ चे पत्राची नोंद घेणे.**

बँकेस सन २०१५-१६ पासून सतत संचीत तोटा आहे. बँकेस मागील ५ वर्षे सतत संचीत तोटा असल्याने सर्वच बाजूने बँकेच्या व्यवसाय वाढीवर मर्यादा आहेत. अशा परिस्थितीत बँकेचा ३१ मार्च २०२१ अखेरचा संचीत तोटा रू. २९४.०९ लाख असून तो कमी करावयाचा असल्यास बँकेचे खेळते भांडवल संपूर्ण अर्थिक वर्षभर सतत किमान रू. १०० कोटींपेक्षा जास्त असेल व त्या संपूर्ण अर्थिक वर्षात सतत सी.डी. रेषो हा ६५% ते ७०% असेल आणि त्याच बरोबर ढोबळ एन.पी.ए. चे प्रमाण ३ % चया आत असल्यास त्या वर्षी बँकेचा हा तोटा निरस्त होवू शकतो. मात्र सद्य स्थितीत सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार राखीव निधी व भागभाडवलाच्या निर्लेखानातून समायोजित होणाऱ्या रकमेतून संचीत तोटा निरस्त करणे शक्य आहे. संचीत तोटा निरस्त केल्याने भागधारकांचे कोणतेही प्रत्यक्ष नुकसान होत नसून मुल्यांकना प्रमाणे लेख्यामध्ये प्रत्यक्ष मुल्यांकन दाखविले जाईल व प्रतिवर्षी बँक निव्वळ नफ्यातून या साठी स्वतंत्र निधी संकलीत करेल. बँकेची स्व मालकीची मिळकत विक्री करून त्यातून प्राप्त होणारी रक्कम ही ज्या भागधारकांच्या भागांचे निर्लेखन होणार आहे त्यांच्यासाठी समायोजित केली जाईल. अशा पध्दतीने निर्लेखीत भाग रकमेचे पुनर्बांधणी करून संबंधीत भागधारकांना त्यांची रक्कम परत केली जाईल. यासाठी बँकेस १० वर्षांचा कालावधी लागणार असला तरी त्यापूर्वीच निर्लेखीत भागांचे पुनर्बांधणी करणार असल्याने बँकेची भविष्यातील संपूर्ण प्रगती ही केवळ संचीत तोट्याचे निर्लेखनावर अवलंबून असल्याने सभासदांनी केलेल्या सूचनेनुसार व मागील वार्षिक सर्वसाधारण सभेने राखीव निधी व भागभांडवलाचे निर्लेखन करून समायोजित होणाऱ्या रकमेतून संचीत तोटा निरस्त करणेबाबत ठराव संमत केलेला होता . त्या अनुषंगाने बँकेने सहकार विभागाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २३ व ४९ नुसार निर्लेखनाबाबतची आवश्यक ती कर्यपध्दती अवलंबून दि.१०/०५/२०२१ रोजी प्रस्ताव दाखल केला होता. सदर प्रस्तावास मा. अपर निबंधक (प्रशासन) सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि. १४/०६/२०२१ च्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.सदर पत्राची सर्व सभासदांनी नोंद घेण्यात यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.**

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. १३ :- बँकेचा २४ व्या वार्षिक सर्वासाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणेबाबत निर्णय घेणे.**

**कोविड १९ प्रादुर्भाव व निर्बांधांच्या अनुषंगाने तसेच अन्य काही कारणांमुळे बँकेच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस जे सभासद उपस्थित राहू शकले नाहीत त्यांची अनुपस्थिती सभेने क्षमापित करावी ही विनंती.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पुणे कमर्शिअल को-ऑप. बँक लि.

**मुख्य कार्यालय :- F ९/१०, आदर्श शिवनेरी, रहिमतपूर रोड, मॉडर्न हायस्कूल समोर, कोरेगांव, जि. सातारा.**

---

## २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**विषय क्र. १४ :- मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.**

**मा. अध्यक्षांच्या अनुज्ञेने आलेले विषय पुढील प्रमाणे.**

**विषय क्र. १४ अ. :- बँकेचा स्वत:चा विमा व्यवसाय सुरू करणेबाबत विचार विनिमय करणे.**

बँकेमार्फत बँकेच्या सभासदांना विविध प्रकार्चा कर्ज पुरवठा करण्यात येत असतो. उदा. इलेक्ट्रिक मोटार. पाईप लाईन, ट्रॅक्टर ट्रॉली, दुचाकी, चार टाकी, गृहकर्ज, मशिनरी, सोने तारण कर्ज, शेती पुरक व्यवसाय , दुग्ध व्यवसाय बँकेच्या सर्व प्रकारच्या मालमत्ता (बँकेच्या स्वमालकीच्या व भाडोत्री इमारती, डेड स्टॉक, फर्निचर. बँकर्स इंडेमनिटी पॉलिसी, संगणक व सायबर विमा) इ. करीता बँक बाजारीतील अन्य विमा कंपन्यांवर अवलंबून रहावे लागते अशा परिस्थितीत बँकेने स्वत:चा विमा व्यवसाय सुरू केल्यास बँकेच्या सभासदांना आपत्कालीन परिस्थितीमुळे किंवा अन्य कारणांनी नुकसान झाल्यास तात्काळ विमा कंपनी मार्फत भरपाई मिळवून देणे शक्य होईल जेणेकरून बँकेचा सभासद/ग्राहक अर्थिक नुकसानू पासून सुरक्षीत होईल व बँकेस देखील ५०% पर्यंत विमा कमिशन मिळू शकेल. बँकेचा संपूर्ण विमा व्यवसाय एक खीडकी योजने प्रमाणे करण्यासाठी बँकेने IRDA यांचे कडून कॉर्पोरेट परवाना घेवून या माध्यमातून बाजारातील TATA AIG जनरल इंशुरन्स, बजाज अलांयन्स, HDFC, ICICI LOMBARD , या प्रख्यात कंपन्यांस सोबत सामंजस्य करार करून बँकेचा स्वत:चा विमा व्यवसाय वाढवावा या बाबत विचार करण्यात यावा. अशी सूचना सभासदांमधून आलेली आहे त्यास मंजूरीस मा. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूरी द्यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

**विषय क्र. १४ ब :- बँकेची सहकार विभागा मार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६३ च्या कलम ८९ अ अन्वये बँकेच्या झालेल्या तपासणी अहवालाची नोंद घेणे.**

सहकार विभाग महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६३ च्या कलम ८९ अ अन्वये सहकारी बँकांची नियमित तपासणी केली जाते. मा.अपर निबंधक (प्रशासन), सहकार विभाग पुणे यांचेकडील आदेशानुसार मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कोरेगांव तथा तपासणी अधिकारी यांनी नुकतीच बँकेची तपासणी केली असून त्याबाबतचा अहवाल दि. ०६/०८/२०२१ रोजी बँकेस दिला आहे. सदर अहवालामध्ये तपासणी अधिकाऱ्यांनी बँकेच्या कामाकाजा बाबत समाधान व्यक्त केलेले आहे. सदर अहवालाची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी ही विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी

**विषय क्र. १४ क बँकेच्या सभासदांना सवलतीच्या दरात दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात यावी याबाबत सभासदांकडून आलेल्या मागणीचा विचार विनिमय करणे.**

बँक सभासद/ ग्राहकांच्या अर्थिक सुरक्षिततेसाठी विविध उपक्रम राबवित असते . त्या प्रमाणेच बँकेच्या सभासदांना सवलतीच्या दरात दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यात यावी याबाबत बँकेच्या काही सभासदांनी बँकेकडे विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पुणे वैद्यकिय सेवा व संशोधन प्रकल्प समिती पुणे यांचे मार्फत चालविण्यात येणाऱ्या स्व. बाळासाहेब देवरस पॉलिक्लिनिक या संस्थेबरोबर बँकेने सामंजस्य करार केलेला असून त्या माध्यमातून बँकेच्या सभासदांना सर्व प्रकारच्या वैद्यकिय सुविधा, तपासणी व उपचार ५०% सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याचा निर्णय बँक व्यवस्थापनाने घेतलेला आहे. बँकेच्या सर्व सभासद, ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा ही विनंती.

या नंतर कुठलेही विषय उपस्थित न झाल्याने सर्व सभासदांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जाहीर केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी